पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

दि. १८/०८/२०२२

**प्रेसनोट**

**सापळा कारवाई दोषसिध्दी**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंध विभाग लातूर |
| पोलीस ठाणे व गुरनं | किल्लारी जि. लातूर गुरनं. १६८/२०१६<br>मा. जिल्हा व विशेष सत्र न्यायालय, लातूर विशेष खटला क्र. ०३/२०१७ |
| कलम | ७, १३, (१) (ड) सह १३ (२) भ्र.प्र.का. १९८८ अन्वये |
| आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | रमाकांत सिद्राम जाधव वय ४५ वर्षे पद पोलीस नाईक, ब.नं. ११०२ पोलीस ठाणे किल्लारी ता. औसा, जि. लातूर वर्ग ३ रा. सुभाष नगर महाराष्ट्र हाउसिंग सोसायटी लातूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रूपये |
| हस्तगत लाचेची रक्कम | ५०,०००/- रूपये |
| थोडक्यात हकिगत | यातील मूळ तक्रारदार यांचे शेतातील चोरी गेलेल्या सोयाबीन पिक चोरी केलल्या लोकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यासाठी तसेच शेतीचा वाद मिटवण्याच्या कामासाठी आलोसे यांनी २,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती.<br>फिर्यादी यांना आलोसे यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामूळे दि.०३/११/२०१६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर यांचेकडे तक्रारी अर्ज दिला होता.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दि.०३/११/२०१६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे २,००,०००/- रुपये इतक्या रक्कमेची लाच स्वरुपात मागणी करुन तडजोडीअंती ५०,०००/- रुपये घेण्याचे कबूल केले, व दि.०३/११/२०१६ रोजी मागणी केलेली लाचेची रक्कम ५०,०००/- रुपये पंचासमक्ष स्विकारली होती.<br>सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांनी करुन मा. जिल्हा व विशेष सत्र न्यायालय, लातूर येथे दोषारोप दाखल केले होते. सदर खटल्यामध्ये सरकारी पक्षाचे वतीने घेण्यात आलेले साक्षीदारांचे पुरावे ग्राहय धरुन आज दि.१८/०८/२०२२ रोजी मा. न्यायालयाने आरोपी रमाकांत सिद्राम जाधव वय ४५ वर्षे पद पोलीस नाईक, ब.नं. ११०२ पोलीस ठाणे किल्लारी, लातुर वर्ग ३ रा. सुभाष नगर, लातूर यास कलम ७ अन्वये १ वर्षे कारावास व ५,०००/- रुपये दंड व कलम १३, (१) (ड) सह १३ (२) भ्र.प्र.का. १९८८ अन्वये १ वर्षे कारावास व ५,०००/- रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आलेली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार पक्षाच्या वतीने सहा. सरकारी अभियोक्ता मिरा कुलकर्णी यांनी बाजू मांडली. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांनी केला असून सदर खटल्यामध्ये पंडीत रेजितवाड पोलीस उपअधीक्षक लाप्रवि लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणून, पो.नि. भास्कर पुल्ली, अन्वर मुजावर, पोह रमाकांत चाटे व फारुख दामटे यांनी काम पाहीले आहे. |

**पंडीत रेजितवाड**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर**

Scanned with CamS